प्रवेश सं०

विषय: धर्मशास्त्र

क्रम सं०

नाम तिथि निर्णय रत्नमाला

ग्रन्थकार शङ्कर दैवज्ञ:

पत्र सं० १-१३

श्लोक सं०

अक्षर सं० (पंक्ति) 42

पंक्ति सं० (पृष्ठे) 11

आकार ८.४ ४.४.

लिपि: दे.ना.

आधार का.

वि० विवरणम पू.

सी० एस० यू० पी०—७७ एम० सी० ई०—१६५१—५० ०००

13892

अा. ८१५८

Indira Gandhi National Centre for the Arts

Indira Gandhi National
Centre for the Arts

॥तत्रादौ चैत्रशुक्लप्रतिपदानिर्णयः॥ तेप्रतिपदा

तिथिनिर्णयः॥ ॥श्रीगणेशायनमः॥ ॐ॥ अथव्रतविशेषेण तिथिनिर्णयो लिख्यते॥ ... सूर्योदयकाळी असलीतरि पहिले दिवसी करावी॥ जरि दोही दिवसी
सूर्योदईजे असेल ते करावि॥ जरि दोही दिवसी सूर्योदयकाळी असली तरि पहिले दिवसी करावी॥ जरि
सूर्योदयी नसली तरी पाहिले दिवसी करावी॥ अथ चैत्रशुक्लतृतीया॥ हिंदोलतृतीया ती चतुर्थीयुक्त करावी॥ जरि
दुसरे दिवसी घटिका दोन असली तरी दुसरेच दिवसी करावी॥ ते चतृतीया मन्वादि जाणावी॥ इसपितृद्दश्राद्धक
रावें॥ हे तृतीया श्राद्धाकारणें जे पूर्वाह्णी असेल ते करावी॥ पूर्वाह्ण म्हणिजे सूर्योदयाउपरि घटिका साध जरि साघ
टिका दुसरे दिवसी नसली तरि पहिले दिवसी मन्वादिश्राद्ध करवि॥ हे च तृतीयामत्स्यजयंती॥ ते जयंतीव्रताकारणे अप
राह्णव्यापिनी करावी॥ अपराह्णव्यापीनी असल ते दिवसी उपवास करावा॥ चैत्रशुक्ल नवमी रामनवमी॥ ते मध्यान्हव्या
पिनी करावी॥ जरि पहिले दिवसी मध्यान्हव्यापिनी॥ असली दुसरे दिवसी मध्यान्हव्यापिनी नसलि तरि पहिले दि
वसी करावी॥ जरि पहिले दिवसी मध्यान्हव्यापिनी नसली दुसरे दिवसी उरली तमध्यान्हकाळि असलि तर दुसरे दि राम
वसी करावी॥ जरि दोही दिवसी मध्यान्हकाळी असली अथवा नसली तरि जे दिवसी पुनर्वसू नक्षत्रासी योग जे दिवसी १
नवमीसी असेल ते दिवसी करावी॥ जरि दोही दिवसी पुनर्वसू योग नसला तरि जे दिवसि मध्यान्ह जे वेळि असेल ते क

रावी॥ जरि पहिले दिवसी मध्यान्हा जे वेळि नसलि तरी दुसरे दिवसी जे उरली ते चि करावी॥ मध्यान्हम्ह
णिजे घटिका १२ बाराउपरि घटिका ६ जाणाव्या॥ इति रामनवमी॥ चैत्रीपौर्णिमासि सचंदिका सदवणा
चिपूजा करावि॥ ते पूजे कारणे उरली ते तिथी स करावी॥ जरि पहिले दिवसी चतुर्दशी घटिका १८ अठ
रा असली तर दुसरेच दिवसी करावी॥ जरि अठरा घटिका चतुर्दशी नसली दुसरे दिवसी पौर्णिमा अठ
रा घटिकाहून उणि असली तरि पहिले दिवसी पौर्णिमा करावी॥ जरि दुसरे दिवसी अठरा घटिकाहू
न अधिक असली तर दुसरे दिवसी करावी॥ चैत्रीपौर्णिमा मन्वादि जाणावि॥ ते मन्वादिश्राद्धाकारणे पू
र्वाह्णव्यापिनी करावी॥ मेषसंक्रांतीचा पर्वकाळ तर जे वेळेसि मेषसंक्रांति होईल त्या उपरि घटिका १० दाहा जाणावी॥
संक्रांतीचा निर्णय तरि मकरसंक्रांतीचा निर्णयी लिहिला तो जाणावा॥ इति चैत्रमासतिथिनिर्णयः॥ अथ वैशाख
मासः॥ अथ वैशाखमासस्नान तरि चैत्रीपौर्णिमेपासून वैशाखीपौर्णिमेपर्यंत प्रातःकाळी करावे॥ तथे मंत्र॥ वै
शाखं सकलं मासं मेषसंक्रमणे रवौ॥ प्रातः सनियमं स्नास्ये प्रीयतां मधुसूदनः॥ मधुहंतुः प्रसादेन ब्राह्मणाना
मनुग्रहात्॥ निर्विघ्नमस्तु मे पुण्यं वैशाखस्नानमन्वहं॥ माधवे मेषगे भानो मुरारे मधुसूदनः॥ प्रातस्नानेन मे

Indira Gandhi National
Centre for the Arts

तेपूर्वाह्णव्यापिनी करावी॥दोंही
नाथफलदोभवपापहान्॥इतिअथवैशाखशुक्लतृतीया अक्षय्यतृतीया॥तेपूर्वाह्णव्यापिनी करावी॥दोंही
दिवसीपूर्वाह्णव्यापिनिअसलीतऱ्हीदुसरेचदिवसीकरावी॥पूर्वाह्णम्हणिजेघटिका६सा॥तृतीयेदेदिव
सीबुधवारआणिरोहिणीनक्षत्रअसलेतरितेमहापुण्यकारी॥पहिलेदिवसीपूर्वाह्णीबुधवारआणिरोहिणिअस
ल्यानऱ्हीदुसरेचदिवसीउरलीतेचिकरावी॥हे हियुगादिजाणावी॥ईसश्राद्धकरावे॥उदकुंभदानकरावे॥
श्राद्धासहीपूर्वाह्णव्यापिनी करावी॥कुंभदानमंत्रः॥एषधर्मघटोदत्तोब्रह्माविष्णुशिवात्मकः॥अस्यप्रदाना
त्तृप्यंतु पितरोपिपितामहाः॥गंधोदकतिलैर्मिश्रंसान्नंकुंभफलान्वितं॥पितृभ्यःसंप्रदास्यामिअक्षय्यमुप
तिष्ठतु॥१॥अक्षय्यतृतीयचेदिवसीरात्रीभोजनकरूनये॥करीलतरप्रायश्चित्तआहे॥हेचतृतीयापरशुरा
मजयंती॥तेप्रदोषव्यापिनीकरावी॥दोंहीदिवसीप्रदोषव्यापिनीअसलीतऱ्हीदुसरेचदिवसीकरावी॥प्रदोष
म्हणिजेरात्रिच्यापहिल्यादोनघटिका॥जरिदुसरेदिवसीप्रदोषपावेतोनसलीतरिपहिलेदिवसीकरा
वी॥जयंतीनिमित्तउपवासकरावा॥इतिअक्षय्यतृतीयानिर्णयः॥अथवैशाखशुक्लचतुर्दशीनृसिंहजयंती॥ राम
तेहीप्रदोषव्यापिनीकरावी॥दोंहीदिवसीप्रदोषव्यापिनीअसलीतरिदुसरेदिवसीकरावीदोंहीदिवसी ॥२॥

प्रदोषव्यापिनीनसलीतऱ्हीदुसरेचदिवसीकरावी॥इतिनृसिंहजयंती॥वृषभसंक्रांतीचापर्वकाळतरिजे
घटिकासीसंक्रांतहोईलतेघटिकेपासूनपूर्वी सोळा१६घटिकापर्वकाळजाणावा॥वैशाखीअमावस्या
भावयी॥तेउर्वरीतजेअसेलतेकरावी॥चतुर्दशीयुक्तनकरावी॥इतिवैशाखमासतिथिनिर्णयः॥अ
थज्येष्ठमासः॥ज्येष्ठशुद्ध११एकादशीनिर्जळा॥ईसनिश्चयेउपवासकरावा॥आणिउदकुंभदानकरावे॥
मंत्रतरिअक्षय्यतृतीयचेनिर्णईलिहिलाआहेतोचिजाणावा॥ज्येष्ठीपोर्णिमेसिवटसावित्रीव्रत
करावे॥तेचतुर्दशीयुक्तपोर्णिमाअसेलतेदिवसीकरावी॥जरिचतुर्दशी१८अठराघटिकाहूनअ
धिकअसलीतरिदुसरेदिवसीउरलीजेपोर्णिमातेदिवसीकरावी॥अत्रविशेषः॥सावित्रीचीप्रति
मासुवर्णाचीअथवायथाशक्तिधातूचीअथवामृत्तिकेचीकरूनषोडशोपचारपूजाकरावी॥सु
वासिनीसहरिद्रावमंगळसूत्रेवसौभाग्यद्रव्यद्यावी॥तेप्रतिमाब्राह्मणासद्यावी॥तेथमंत्र॥सावि
त्रीयंमयादत्तासहिरण्यामहासती॥ब्राह्मणःप्रीणनार्थायब्राह्मणःप्रतिगृह्यतां॥व्रतेनानेनराजेंद्र वै
धव्यंनाप्नुयात्क्वचित्॥१॥ज्येष्ठीपोर्णिमामन्वादिश्राद्धाकारणेपूर्वाह्णव्यापिनीकरावी॥उदकुंभदा

Indira Gandhi National
Centre for the Arts

नहीकरावें॥ मिथुनसंक्रांतीचापर्वकाळतरिजेघटिकेससंक्रांतिहोईलतेघटिकेपासूनपुढेंघटिका
१६ सोळापर्वकाळजाणावा॥ इतिज्येष्ठमासतिथिनिर्णयः॥ अथआषाढमासः॥ अषाढशुद्धदशा
मी १० पौर्णमासी १५ मन्वादिः॥ त्याही ■ पूर्वाह्णव्यापिनीकराव्या॥ आषाढशुद्धद्वादशीसजरिअनुरा
धानक्षत्रअसेलतरिपारणनकरावें॥ उपवासदुसराकरावा॥ द्वादशीचावअनुराधानक्षत्राच्यापहि
लाचरणाचायोगअसलातरिउपवासकरावा॥ जरिपहिल्याचरणाचावद्वादशीचायोगनसलातरति
थीचेअंतीअथवानक्षत्राचेअंतीपारणाकरावी॥ अषाढशुक्लएकादशी ११ सअथवाद्वादशीस १२
अथवापौर्णिमासीस १५ चातुर्मास्यव्रताचाआरंभकरावा॥ तेथेंशाकव्रतदोनमहिनेंजाणावें॥
जरिआषाढआधीकमासजालातरिअधीकमासीचआरंभकरावा॥ श्रावणमासीचीपौर्णिमाअ
थवाद्वादशीपर्यंतशाकव्रतकरावें॥ श्रावणद्वादशीपासूनभाद्रपदशुद्धद्वा १२ पर्यंतदधिव्रतकरावें॥
भाद्रपदद्वादशीपासूनआश्विनशुद्ध० १२ पर्यंतदुग्धव्रतकरावें॥ आश्विनशुद्धद्वादशी १२ पासून राम
कार्तिकशुद्ध १२ पावेतोंद्विदळकरावें॥ आषाढमासाचाअधिकमासजालातरीआषाढशुद्ध १५ पौर्णि ॥३॥

मापासूनश्रावणशुद्धपौ १५ पौर्णिमापावेतोंकोकिळाव्रतकरावें॥ व्रताचाआरंभाकारणेंपौर्णिमासा
यान्हव्यापिनीकरावी॥ सायान्हव्यापिनीम्हणजेदिवसाचासवटिलघटिका ६ तोसायान्हजाणावा॥
आषाढीअमावास्येसि ३० दीपपात्रद्यावी॥ तेदुसरेदिवसीजेउरलीअसेलतेकरावी॥ अथकर्कसं
क्रांतीचापर्वकाळजेघटिकेसकर्कसंक्रांतिहोईलतेघटिकेपासूनपहिल्याघटिका ३० तीसपुण्यका
ळजाणावा॥ जरिरात्रीसकर्कसंक्रांतिजालितरिपहिलेदिवसीसायंकाळीघटिका ५ पांचपर्वकाळ
जाणावा॥ जरिदिवसाजालीतरीतेचदिवसीपुण्यकाळजाणावा॥ इतिआषाढमासतिथिनिर्णयः॥
अथश्रावणमासः॥ श्रावणशुद्धचतुर्थीदावाचीचतुथितेमध्यान्हव्यापिनीकरावी॥ श्रावणशुद्धपंच
मीनागपंचमी॥ नागपूजेकारणेंपंचमीउरलीदुसरेदिवसीतीकरावीचतुर्थीयुक्तजेअसेलकेतेरून
ये॥ जरिदुसरेदिवसीघटिका ६ पावेतोंउरलीनसलितरिचतुर्थीयुक्तकरावी॥ इतिनागपंचमी॥ श्राव
णशुद्ध १२ द्वादशीसदधिव्रतकरावें॥ अथश्रावणी॥ जेदिवसीश्रवणनक्षत्रअसेलतेदिवसीऋग्वेद्या
नीश्रावणीकरावी॥ दोहीदिवसीश्रवणनक्षत्रअसलेंतरीउत्तराषाढानक्षत्रयुक्तपहिलेदिवसीअ

Indira Gandhi National
Centre for the Arts

सलेतरितेदिवसींकरूनये॥जेदिवसीं श्रवणघटिका१२ बारापावेतोउरलेउरलेअसलेतेदिवसीश्राव
णीकरावी॥दुसरेदिवसींघटिका६ साहूनश्रवणनक्षत्रउणेउरलेअसलेतरिपहिलेदिवसीश्रावणी
करावी॥जरिश्रावणीचेदिवसींसंक्रांतिअथवाग्रहणअसलेतरिश्रावणशुद्धपंचमीसयजुर्वेदींक
रावी॥जेदिवसीहस्तनक्षत्रअसलेतेदिवसीऋग्वेद्यानीकरावी॥जरिश्रावणीपौर्णिमेसिअर्धरात्री
पलिकडेग्रहणअथवासंक्रांतिअसलीतरीदोषनाहीतेचदिवसीश्रावणीकरावी॥यजुर्वेदियानिश्रा
वणीपौर्णिमेसिकरावी॥जरिपौर्णिमादुसरेदिवसीघटिका६ साहूनिअधीकउरलिअसलेतरि
तेचिदिवसीश्रावणीकरावी॥जरि६ घटिकाहूनउणीअसलीतरिपहिलेदिवसीश्रावणीकरावी॥
जरिश्रावणमासपावेतोअनावृष्टिअसलिओषधीनिघाल्यातरिभाद्रपदमासींहस्तनक्षत्री
ऋग्वेदीकरावीयजुर्वेदीपंचमीसकरावी॥कुलधर्मकारणेपौर्णिमापहिलेदिवसीकरावी॥उरलीअ
सलेतेनकरावी॥अथश्रावणवद्यअष्टमीजन्माष्टमी॥तेमध्यरात्रव्यापिनीकरावी॥मध्यरात्रि
म्हणिजेरात्रीचीपंधरावीसोळावीघटिकाजाणावि॥जरिदोहीदिवसीमध्यरात्रव्यापिनीअसली



अथवानसलीतरिजेदिवसीमध्यरात्रींरोहिणीनक्षत्रअसेलतेदिवसीकरावी॥जरिदोंही दिवसीमध्यरा
त्रींरोहिणीनक्षत्रनसलेतरिदुसरेदिवसीकरावि॥पारणेतरिअष्टमीचेवनक्षत्राचेअंतीकरावेहामु
ख्यपक्ष॥अष्टमीचेअंतिअथवानक्षत्राचेअंती हामध्यमपक्ष॥जरिदिवसातीनप्रहराहुनअधी
कतिथिअसलीतरिप्राथःकाळीपारणेकरावेंहाअधमपक्ष॥इतिजन्माष्टमी॥श्रावणीअमावास्या
पोळीतेवृषभपूजिसिसायंकाळिअसेलतेकरावि॥जरिदोहिदिवसिसायंकाळिअसलितरिदुसरेदि
वसीकरावी॥जरिदोहीदिवसीसायंकाळिनसलितरिदुसरेचदिवसीकरावी॥सिंहसंक्रांतिचापर्वका
ळतरिजेघटिकेससंक्रांतिहोईलतेघटिकेपासूनपुढेघटिका१६ सोळापर्वकाळजाणावा॥इतिश्रावण
मासः॥अथभाद्रपदमासः॥भाद्रपदशुद्धतृतीयाहरितालिका॥तेजेदिवसींउरलिअसलतेकरावी॥ज
रिदुसरेदिवसीघटिकाहोनउरलिअसेलतेचिकरावी॥पहिलेदिवसींकरूनये॥भाद्रपदशुद्ध४ चतूर्थी
सविनायकव्रतकरावें॥तेचतुर्थीगणेशपूजनासमध्यान्यव्यापिनीकरावी॥जरिपहिलेदिवसीमध्यान्य
व्यापिनीअसेलतरिपहिलेचदिवसीकरावि॥जरिपहिलेदिवसीमध्यान्हव्यापिनीनाहिदुसरेचदिव

Indira Gandhi National
Centre for the Arts

शिं असलतरि दुसरे चदिवसी करावी ॥ जरि दोंहि दिवसी मध्यान्ही नाहीतरि दुसरे दिवसी करावी ॥ जरि दोंहि
दिवसी मध्यान्हव्यापिनी असलितरि जे दिवसी बहुत मध्यान्हव्यापिनी असलते दिवसी करावि ॥ मध्यान्ह
दिवसी मध्यान्हव्यापिनी असलितरि जे दिवसी बहुत मध्यान्हव्यापिनी असल तेदिवसी करावि ॥ मध्यान्ह
म्हणिजे घटिका १२ बारा उपरि घटिका ६ सा जाणाव्या ॥ इति गणेशचतुर्थी ॥ ये चौथीचा चंद्र पाहों नये ॥ जरि
दखिला तरि चोरि चा आळ येतो ॥ जरि दखिला तरि हा मंत्र जपावा ॥ सिंहः प्रसेनमवधीत्सिंहो जांबवता हतः ॥ सु
कुमारक मा रोदीस्तव ह्येष स्यमंतकः ॥ १ ॥ यथाशक्ति हा मंत्र जपिल्याने चंद्रदर्शनाचा दोष जातो ॥ भाद्रपद शु
क्ल ५ पंचमी ऋषिपूजन करावे ॥ हे ऋषिपंचमी तेऋषिपंचमी मध्यान्हव्यापिनी करावि ॥ जरि दोंहि दि
वसी मध्यान्हव्यापिनी असलीतरि पहिल्याच दिवशी चतुर्थीयुक्त करावि ॥ मध्यान्ह म्हणिजे घटिका
१२ उपरि घटिका ६ सा जाणाव्या ॥ इति ऋषिपंचमी ॥ भाद्रपद शुद्ध द्वादशी स १२ जरि श्रवणनक्षत्र अस
लते तरि उपवास करावा ॥ हे श्रवणद्वादशी जाणावी ॥ जरि दुसरे दिवसी प्रातःकाळी घटिका ६ सा
मध्ये द्वादशीचा श्रवणाचा योग असलातरि द्वादशीस हि उपवास करावा ॥ त्यास शक्ति असल्य

राम

॥५॥

स्याने करावा ॥ वैष्णवानी अवश्यमेव उपवास करावा ॥ त्यास उपवास दुसरा करावया शक्ति नस

लितरी तिथीचे अंति नक्षत्राचे अंति पारणे करावे ॥ अथवा दोघांतुन एकाचे अंती तरि पारणे करावे ॥
भाद्रपद शुद्ध १२ द्वादशी श्रवणयुक्ता वामनजयंती ॥ ते मध्यान्हव्यापिनी वामनजयंती जाणावी ॥ य
चद्वादशीस दुग्धव्रत करावे ॥ भाद्रपद शुद्ध चतुर्दशीस १४ अनंतव्रत करावे ॥ ते चतुर्दशीस अनंत
व्रत पूजे आधि उदयतिथि करावी ॥ दुसरे दिवसी घटिका दोन उरलितरि दुसरेचा दिवसी अनंतव्रत
करावे ॥ पहिले दिवशी करू नये ॥ भाद्रपद वद्य प्रतिपदेपासून दिवस सोळा १६ आश्विन शुद्ध प्रति
पदा १ पावेतो प्रत्यह श्राद्ध करावे ॥ तो पितृपक्ष जाणावा ॥ अथवा येक च दिवसी महालय करावे ॥
त्यामध्ये आपघातें हत असल त्याचे श्राद्ध चतुर्दशीस करावे ॥ भाद्रपद वद्य ६ षष्ठी ते कपिलाषष्ठि
जाणावि ॥ तदुक्तं भाद्रपदस्यासितपक्षषष्ठी भौमेनसंयुक्ता ॥ व्यतीपातेन रोहिण्या ॥ षष्ठी क
पिलासमता ॥ १ ॥ भाद्रपद मास १२ (?) कृष्णपक्ष ० षष्ठी तिथि ० मंगळवार ० रोहिणी नक्षत्र ० व्यतीपातयो
ग ० हा ईतुका योग असल्यातरि कपिलाषष्ठी जाणावी ॥ हा योग दिवसी असल्यातरि कपिलाषष्ठी जा
णावी ॥ रात्री असल्यातरि करू नये ॥ भाद्रपद वद्य अष्टमीस महालक्ष्मी व्रत करावे ॥ ते अष्टमी

Indira Gandhi National
Centre for the Arts

सिंअसेलतरिदुसरेच दिवसीकरावी॥जरिदोंही दिवसीमध्यान्हीनाहीतरिदुसरे दिवसीकरावी॥जरिदोंहि
दिवसीमध्यान्हव्यापिनीअसलितरिजे दिवसी बहुतमध्यान्हव्यापिनीअसेलते दिवसीकरावि॥मध्यान्ह
ह्मणिजेघटिका१२बाराउपरिघटिका६साजाणाव्या॥इतिगणेशचतुर्थी॥येचोथीचाचंद्रपाहोनये॥जरि
देखिलातरिचोरिचाआळयेतो॥जरिदेखिलातरिहामंत्रजपावा॥सिंहप्रसेनमवधीत्सिंहोजांबवताहतः॥सु
कुमारकमारोदीस्तवह्येषस्यमंतकः॥१॥यथाशक्त्याहामंत्रजपिल्यानेचंद्रदर्शनाचादोषजातो॥भाद्रपदशु
क्ल५पंचमीसऋषिपूजनकरावें॥हेऋषपंचमीतेऋषपंचमीमध्यान्हव्यापिनीकरावि॥जरिदोंहीदि
वसीमध्यान्हव्यापिनीअसलीतरिपहीलेचदिवसीचतुर्थीयुक्तकरावि॥मध्यान्हह्मणिजेघटिका
१२उपरिघटिका६साजाणाव्या॥इतिऋषपंचमी॥भाद्रपदशुद्धद्वादशीस१२जरिश्रवणनक्षत्रअस
लेतरिउपवासकरावा॥हेचिश्रवणद्वादशीजाणावी॥जरिदुसरेदिवसीप्रातःकाळिंघटिका६सा
मध्येंद्वादशीचाश्रवणाचायोगअसलातरिद्वादशीसहिउपवासकरावा॥ज्यासशक्तिअसेल
त्यानेकरावा॥वैष्णवानीअवश्यमेवउपवासकरावा॥ज्यासउपवासदुसराकरायाचिशक्तिनस - राम ॥५॥

लितरीतिथीचेअंतिंवनक्षत्राचेअंतिंपारणेकरावें॥अथवादोघांतूनयेकाचेअंतीतरीपारणेकरावें॥
भाद्रपदशुद्ध११एकादशीश्रवणयुक्तावामनजयंती॥तेमध्यान्हव्यापिनीवामनजयंतीजाणावी॥य
चद्वादशीसदुग्धव्रतकरावें॥भाद्रपदशुद्धचतुर्दशीस१४अनंतव्रतकरावें॥तेचतुर्दशीसअनंत
व्रतपूजेत्रिउरलितिथिकरावी॥दुसरेदिवसीघटिकादोनिउरलितरिदुसरेचदिवसीअनंतव्रत
करावें॥पहिलेदिवशीकरूनये॥भाद्रपदवद्यप्रतिपदेपासूनदिवससोळा१६आश्विनशुद्धप्रति
पदा१पावताप्रत्यहश्राद्धकरावें॥तोपितृपाटाजाणावा॥अथवायेकेचदिवसीमहालयकरावें॥
त्यामध्येंजोशस्त्रहतअसेलत्याचेश्राद्धचतुर्दशीसकरावें॥भाद्रपदवद्य६षष्ठीतेकपिलाषष्ठि
जाणावि॥तेऐसिभाद्रपदस्यासितपक्षेषष्ठीभौमेनसंयुता॥व्यतीपातेचरोहिण्यासाषष्ठीक
पिलास्मृता॥१॥भाद्रपदमासवद्यपक्ष॰षष्ठीतिथि॰मंगळवार॰रोहिणीनक्षत्र॰व्यतीपातयो
ग॰हाईतुकायोगअसलातरिकपिलाषष्ठीजाणावी॥हायोगदिवसाअसलातरिकपिलाषष्ठीजा
णावी॥रात्रीअसलातरिकरूनये॥भाद्रपदवद्यअष्टमीसमहालक्ष्मीव्रतकरावें॥तेअष्टमी

Indira Gandhi National
Centre for the Arts

मध्यरात्रीजेचंद्रोदयीअसेलतेदिवसी॥दोंहीदिवसीचंद्रोदयीअसलिंनरिदुसरेचदिवसीक
रावि॥ज्येष्ठादेवीव्रततरि॥तदिवसीअनुराधानक्षत्रअसलतेदिवसीबसवाव्या॥ज्येष्ठानक्ष
त्रावरिपुजाव्या॥मूळनक्षत्रावरिविसर्जनकरावें॥हेव्रततीनदिवसकरावें॥इतिभाद्रपदमासव्रता
नि॥अथाश्विनमासः॥अश्विनशुद्धप्रतिपदेसिदौहित्रश्राद्धकरावें॥~~मातामहास्तणिजे~~॥दौ
हित्रस्तणिजेलेंकिचालेक॥त्यानेमातामहाचेश्राद्धकरावें॥मातामहाह्मणिजेमायेचाबाप॥आ
श्विनशुद्धप्रतिपदेसघटस्थापनानवरात्राचीकरावी॥घटस्थापनाकारणप्रतिपदा॥अमावस्या
युक्तजेअसेलतेनकरावी॥दुसरेदिवसीघटिका१एकजहीअसलीतरितेचिकरावी॥प्रतिपदेचाम
मध्येघटस्थापनाकरावी॥जरिंप्रतिपदेचेदिवसीचित्रानक्षत्रअथवावैधृतिअसलीतरिदो
नप्रहरपावेतोंप्रतिपदाअसलीतरिदोप्रहराअभिजितमुहुर्तीघटस्थापनाकरावि॥अभि
जितमूहर्तह्मणिजेपंधरावीसोळावीघटिकाजरिचित्रावैधृतिअसलिआणिसोळाघटिका
पावेतोंप्रतिपदानसलितरिप्रातःकाळीचघटस्थापनाकरावी॥द्वितीयिमध्येंकरूंनये॥जरिं
दुसरेदिवसीप्रतिपदाउरलीनसलीतरिजेप्रतिपदाअमावास्यायुक्तअसेलतेचदिवसीघटस्था



पनाकरावी॥जरिप्रतिपदाघटिका६०साठिआसानदुसरेदिवसीघटिका१अथवादोनि२उर
लिअसलिंनरिजेदिवसीघटिका६०साठिअसेलतेचदिवसीघटस्थापनाकरावी॥उरलि
जेप्रतिपदातीसनकरावी॥अश्विनशुद्धपंचमीस५उपांगललिताव्रतकरावें॥तेपंचमीजरिं
दुसरेदीवसिघटिका१८अठरापावेतोअसलितरिदुसरेदिवसीकरावी॥जरिअठराघटिकानसलि
तरिंपहिलेचदिवसीकरावि॥अश्विनशुद्धअष्टमीसउपवासकरावा॥तेअष्टमीसप्तमीयुक्तजेअ
सलतेकरूंनये॥नवमीयुक्तजेअसेलतेंकरावी॥नवमीनरिंअष्टमीयुक्तकरावि॥दुसरेदिवसीनव
मीकांहीउरलिअसेलतरिंनवमीचमध्येंहोमबळिदानकरावें॥जरिदुसरेदिवसीनमीवेमध्यान्हपरि
यंतअसलीतरितेचदिवसीपारणेकरावि॥होमतरिअष्टमीयुक्तनवमीअसलितरिअष्टमीमध्येंआ
रंभकरूननवमीमध्येंसमाप्तिकरावी॥दुसरेदिवसीनवमीउरलीनसलितरिअष्टमीयुक्तनवमिसचहो
मचपारणेकरावें॥अश्विनशुद्धदशमीविजयादशमी॥तेसायंकाळव्यापिनीकरावी॥पहिलेदिवसीन
वमीसायंकाळपर्यंतअसलि॥दुसरेदिवसीदशमीसायंकाळपर्यंतअसलितरिदुसरेदिवसीकरावि॥

Indira Gandhi National
Centre for the Arts

अथवा जे दिवसिं सायंकाळि श्रवण नक्षत्र व दशमी असलि तरि तेच दिवसी विजयादशमी करावि॥ जरि
सायंकाळि दशमी स श्रवण नक्षत्र नाहि तरि जे सायंकाळि दशमी असेल तेचि करावि॥ श्रवणाचे प्र
योजन नाहिं॥ दुसरे दिवसी सायंकाळि दशमी नसलि पहिले दिवसी असली तरि पहिल्ये दिवसी करावी॥ टे
शमी पूजन करावें॥ प्रार्थनेचा मंत्र॥ अमंगलानां शमनीं शमनीं दुष्कृतस्य च॥ दुःस्वप्न नाशनीं धन्यां प्रप
द्येहं शमीं शुभा॥१॥ शमी शमयते पापं शमी लोहितकंटका॥ धारिण्यर्जुनबाणानां रामस्य प्रियवादि
नी॥२॥ करिष्यमाण यात्रायां यथाकालं सुखं मया॥ तत्र निर्विघ्नकर्त्री त्वं भव श्रीरामपूजिते॥३॥ ऐसि
प्रार्थना करून शमी चि मूलची मृत्तिका घ्यावि॥ अथवा पत्रे घेउन घरास यावें॥ इति विजयादशमी॥ कार्ति
कस्नान तरि अश्विन शुक्ल एकादशीपासून अथवा पुनीवपासून करावें॥ तेथें मंत्र॥ कार्तिकेहं करि
ष्यामि प्रातःस्नानं जनार्दन प्रीत्यर्थं तव देवेश दामोदर मया सह॥१॥ हा मंत्र म्हणोन मौन करून स्नान
करावें॥ अर्घ्याचा मंत्र॥ व्रतिनः कार्तिके मासि स्नातस्य विधिवन्मम॥ गृहाणार्घ्यं मया दत्तं दनुजेंद्र नि
षूदन॥१॥ नित्यनैमित्तिके कृष्ण कार्तिके पापनाशने॥ गृहाणार्घ्यं मया दत्तं राधया सहितो हरे॥ हे दोन्ही राम
मंत्र म्हणोन अर्घ्य द्यावें॥ आश्विन शुद्ध द्वादशीपासून दिंदर्ळे करावें॥ आकाशदीप द्यावा॥ तेथें मंत्र॥ ॥८॥



दामोदराय नभसि तुलायां लोलया सह॥ प्रदीपं ते प्रयच्छामि नमोऽनंताय वेधसे॥१॥ अश्विन कृष्ण द्वा
दशी गोवत्सा॥ ते प्रदोषव्यापिनी करावी॥ दोन्ही दिवसी प्रदोषकाळी असली तरि पहिले दिवसी क
रावी॥ ईस वत्सपूजा करावी॥ आश्विन कृष्ण चतुर्दशी १४॥ नरक चतुर्दशी ते प्रातःकाळी चंद्रोदई
असले ते करावी॥ दोन्ही दिवसी चंद्रोदई असली तरि दुसरे दिवसी अमावास्यायुक्त करावी॥ अभ्यं
ग तरि पाहटे चतुर्दशीमध्ये अरुणोदई करावा॥ अरुणोदय म्हणिजे सत्तावनावी घटिका ५७ दोन्ही दि
वसी चंद्रोदई नसली तरि जे दिवसी रात्रीच्या चोथे प्रहरी असेल ते करावी॥ अभ्यंग चतुर्दशीम
ध्ये करावा॥ अभ्यंग समई आगाघोवता अघाडा घोवडावा॥ तेथें मंत्र॥ सिवालोष्ठ समायुक्त
सकंटक दलान्विता॥ हर पापमपामार्ग भ्राम्यमाणः पुनः पुनः॥१॥ अश्विनी अमावास्या दिपवाळी॥
ते प्रदोषव्यापिनी करावी॥ चतुर्दशीयुक्त जे अमावास्या असेल ते दिवसी सायंकाळी दीप लावा
वे दोन्ही दिवसी प्रदोषकाळी असली तरि दुसरे दिवसी करावि॥ प्रदोष म्हणिजे रात्रीच्या पहि
ल्या घटिका २ अमावास्ये सहित पाहाटे तैलाभ्यंग करावा॥ इति दीपवाळि॥ इति अश्वि॰ यः॥

Indira Gandhi National
Centre for the Arts

अथकार्तिकमासः।।कार्तिकशुद्धप्रतिपदा दिवाळीचापाडवा।।तेप्रतिपदाअमावास्यायुक्तन
करावी।।दुसरे दिवसीजेउरली असेलते विकरावी।।येचिप्रतिपदेसिगोवर्द्धनपूजावगोक्री
डनाकरावे।।तेप्रतिपदागोक्रीडनाससायान्हव्यापिनीकरावी।।सायान्हम्हणिजे दिवसाचे
दीसाघटिका२४उपरि५घटिकाजाणावा।।जरिदोंही दिवसीसायान्हकाळीअसलीतरीदुसरेदिव
सीकरावी।।जरिदुसरे दिवसीसायान्हीनसलीतरिपहिले दिवसीअमावास्यायुक्तकरावी।।कार्ति
कशुद्धद्वितीयाभाउबीज।।यबीजसिअपलेघरिभोजनकरूनये।।बहिणीचेघरिअवश्यमेवकरा
वें।।जरिबहिणनसलीतरिमानिलीजेबहीणम्हणउनअसेलतीचेघरिकरावें।।कार्तिकशुद्धनव
मीयुगादि।।तेचदिवसीपूर्वाह्णीअसेलतेकरावी।।कार्तिकशुद्धद्वादशीरेवतीनक्षत्रनसलेतरि
स पारणकरावे।।जरिरेवतिअसिल्यानंतरउपवासकरावा।।त्यामध्येंहीरेवतीचाचोथाचरण
टाकूनपारणकरावें।।चोथेचरणीकरूनये।।येचद्वादशीससायंकाळितुलसीपूजनकरावें।।
चातुर्मास्यव्रताचीसमाप्तिकरावी।।तेथेमंत्रइदंव्रतंमयादेवगृहीतंप्रीत्यैतवप्रभो।।न्यूनंसंपूर्ण राम ।८।।
तांयातुत्वत्प्रसादाज्जनार्दन।।१।।कार्तिकशुद्धचतुर्दशी१४वैकुंठचतुर्दशी।।तेविष्णुपूजेकार

णेरात्रीव्यापिनीकरावी।।उपवासकरावा।।कार्तिकपोर्णिमेसित्रिपुरजाळावा।।तेसायंकाळिअसेल
तेकरावी।।दोंही दिवसीसायंकाळीअसली अथवानसलितरदोंही दुसरेच दिवसीकरावी।।येपोर्णिमेसि
सायंकाळीमत्स्यावतारजाला।।हेमत्स्यजयंती।।कार्तिकीपोर्णिमेसकृत्तिकानक्षत्रअसेलतरिस्वा
मिकार्तिकाचेंदर्शनकरावें।।कार्तिककृष्णअष्टमीकाळभैरवाष्टमीहेउपवासकारणेरात्रीव्यापिनी
करावी।।दोंही दिवसीरात्रीव्यापिनीअसलीतरिपहिलेदिवसीकरावी।।~~कार्तिककृष्णअष्टमीका~~
इतिकार्तिकमासतिथिनिर्णयः।।अथमार्गशीर्षः।।मार्गशीर्षशुद्धपंचमीनागदेवाचीपंचमी।।
तेषष्ठीयुक्तजेअसेलतेकरावी।।मार्गशीर्षशुद्धषष्ठी६चंपाषष्ठी।।तेसप्तमीयुक्तकरावी।।हे
षष्ठीआदित्यवारीशततारकानक्षत्रअसेलतेदिवसींकरावी।।जरिआदित्यवारनक्षत्रन
सलेतरिजेपूर्वाह्णिअसेलतेकरावी।।पूर्वाह्णम्हणिजेपहिल्या६घटिका।।जरिपहिलेदिव
सीपूर्वाह्णीनसलीतरिदुसरेदिवसीकरावी।।इतिचंपाषष्ठी।।मार्गशीर्षपोर्णमासीसदत्ता
त्रयाचीजयंती।।तेप्रदोषव्यापिनीकरावी।।प्रदोषम्हणिजेरात्रिव्यापहिल्यादोनिघटिका

Indira Gandhi National
Centre for the Arts

॥२॥जरिदोंहि दिवसींप्रदोषकाळीअसलिंअथवानसलितरिदुसरेदिवसींकरावी॥धनसंक्रांति
च्याउत्तरघटिका१६सोळापर्वकाळजाणावा॥इतिमार्गशीर्षमासः॥अथपौषमासः॥पौषशुद्धष
ष्ठी६बांगरषष्ठीहहीउत्तरकरावी॥पौषीपौर्णिमाकुळधर्माकारणेचतुर्दशीयुक्तकरावी॥जरि
चतुर्दशी घटिका१८हुनअधिकअसलीतरिदुसरेदिवसींकरावी॥पौषमासाचिअमावास्या
३०जरिअदित्यवारश्रवणनक्षत्रव्यतिपातयोगअसलातरिअर्द्धोदयपर्वकाळजाणावा॥कांहियोग
उणाअसलातरिमहोदयजाणावा॥मकरसंक्रांतीचापर्वकाळतरिदिवसाघटिकेसिसंक्रांतिहोईल
तेघटिकेपासूनपुढेघटिका४०चाळिसपुण्यकाळजाणावा॥अलिकडेंकसलनये॥जरिसंक्रांति
रात्रीजालीतरिदुसरेदिवसींपर्वकाळजाणावा॥दुसरेदिवसींसूर्योदयाउपरिघटिका५पांचअत्यं
तपुण्यकाळजाणावा॥मध्यान्हपर्यंतमध्यम॥पौषीपौर्णिमेसमाघस्नानासआरंभकरावा॥स्ना
नारंभाचामंत्र॥माघमासमिमंपूर्णंस्नास्येहंदेवमाधव॥तीर्थस्यास्यजलेनित्यमितिसंकल्प्यचेत
सी॥प्रत्यहस्नानमंत्रः॥दुःखदारिद्र्यनाशायश्रीविष्णोस्तोषणायच॥प्रातःस्नानंकरोम्यद्य



माघेपापविनाशनं॥१॥मकरस्थेरवौमाघेगोविंदाच्युतमाधव॥स्नानेनानेनमेदेवयथोक्त
फलदोभव॥२॥हेदोन्हीमंत्रप्रत्यहम्हणोनस्नानकरावें॥स्नानाचाकाळतरिसूर्योदईस्ना
नकरावें॥इतिपौषमासः॥अथमाघमासः॥माघशुद्धसप्तमी७रथसप्तमीतेअरुणोदईजे
दिवसींअसेलतकरावि॥अरुणोदयम्हणिजेसूर्योदयापूर्विघटिका३तीनजाणावा॥दोहींदि
वसींअरुणोदईअसलिअसलितरिदुसरेदिवसींकरावि॥दोहिदिवसींअरुणोदईनसलित
रिषष्ठीयुक्तजेअसेलतेकरावितेऐसीजाणावि॥पहिलेदिवसींषष्ठिघटिका२दोनितेचदिव
सींसप्तमीचाक्षयअसलातोअसा॥तेचदिवसींसप्तमीघटिका५३त्रीपन्नआहेअरुणोदईदो
हीदिवसीनाहिं॥ऐसेंअसलेंतरिषष्ठीयुक्तकरावि॥नाहिंतरिषष्ठीयुक्तकरूनये॥जेउरलिअ
सेलतेचकरावि॥इतिरथसप्तमी॥अथशिवरात्रिनिर्णयः॥माघवद्य१४चतुर्दशीशिवरात्रिः॥
तेमध्यरात्रीअसेलतेकरावी॥मध्यरात्रिम्हणजेरात्रिचीपंधरावी१५सोळावीघटिका॥जरिदो
हीदिवसीमध्यरात्रिअसलितरिदुसरेचदिवसींकरावि॥जरिपहिलेदिवसींमध्यरात्रिअहेअणि

Indira Gandhi National
Centre for the Arts

दुसरे दिवसी नाहीं तरि पहिले दिवसी करावि ॥ महिन्याचि शिवरात्रि तरि जे दिवसी प्रदोषकाळिं
असेल ते करावि ॥ दोहिं दिवसी प्रदोषकाळिं असलि तरि पहिले दिवसी करावी ॥ दोहि दिवसी प्रदोषकाळिं नस
लि तरि पहिलेच दिवसी करावि ॥ शिवरात्रिचे पारणे तरि ॥ जरि दुसरे दिवसी चतुर्दशी तीन प्रहराहुन अधिक
असलि तरि प्रातःकाळी चतुर्दशीमध्येंच करावें ॥ जरि तीन प्रहराहुन उणि असलि तरि चतुर्दशीचे अंतिं पारणे
करावें ॥ इति शिवरात्रि निर्णयः ॥ माघमासाचि अमावास्या युगादि जाणावि ॥ हे अपरान्ही असेल ते करावी ॥
अपराण्ह म्हणजे घटिका १८ उपरि घटिका ६ ॥ इति माघमास निर्णयः ॥ अथ फाल्गुनः ॥ फाल्गुनी पोर्णिमासी होळि
॥ ते सायंकाळि असेल ते करावि ॥ जरि दोंही दिवसी सायंकाळि असलि तरि दुसरे दिवसी करावि पहिले दिवसी भद्रा
आहे म्हणोन जरि दुसरे दिवसी प्रदोषकाळि नाहिं तरि पहिले दिवसी भद्रेमध्येंच करावि ॥ ^ चतुर्दशीमध्ये व प्रतिपदे
मध्ये होळी करूं नये ॥ दीवसा करूं नये ॥ रात्रीचा भद्रामुख टाकून होळी करावि ॥ भद्रामुख म्हणिजे ॥ पोर्णिमेचे प्र
हर आठ ८ करावे त्यामध्ये चौथा जो प्रहर त्याच्या पहिल्या घटिका पांच ५ ते भद्रामुख जाणावे ॥ त्यावरि होळि क ॥राम॥
रूं नये ॥ पूजेचा मंत्र ॥ दीपयाम्यद्य ते घोरां चिंतिं राक्षससत्तमे ॥ हिताय सर्वजंतूनां प्रीतये पार्वतीपतेः ॥१॥ अ ॥१०॥

सृक्पानभयसंत्रस्तैः कृता त्वं होळि बालिशैः ॥ अतस्त्वां पूजयिष्यामि भूते भूतिप्रदा भव ॥२॥ इति होळि ॥ हे पोर्णि
मा मन्वादि ॥ ते पूर्वाण्ही करावी ॥ प्रतिपदेसि प्रातःकाळी होळीची विभूति वंदावी ॥ तेथे मंत्र ॥ वंदितासि सुरेंद्रेण
ब्रह्मणा शंकरेण च ॥ अतस्त्वं पाहि नो देवि भूते भूतिप्रदा भवः ॥१॥ फाल्गुनी अमावास्या मन्वादि ॥ ते अपराण्ही अ
सेल ते करावी ॥ इति फाल्गुनमासः ॥ अथ संकष्ट हरचतुर्थी निर्णयः ॥ सर्वांही महीन्याची वद्य पक्षिची चतुर्थी
संकष्ट हरचतुर्थी ॥ ते चंद्रोदयी असेल ते करावी ॥ जरि दोंही दिवसी चंद्रोदयी असली तरी दुसरे दिवसी करावी ॥
जरि दोंही दिवसी चंद्रोदयी नसली तरि दुसरेच दिवसी करावी ॥ ॥ अथ एकादशी निर्णयः ॥ ॥ ते एकादशी
चा भेद दोप्रकारिचा ॥ एक स्मार्तांचा एक वैष्णवांचा त्यामध्ये स्मार्तांचा ऐसा ॥ जरि सूर्योदयी एक घटिका अ
थवा पळभर दशमी असली तरी एकादशी विद्ध जाणावी ॥ जरि सूर्योदयी दशमी नसली तरि शुद्ध जाणा
वी ॥ शुद्ध एकादशी अल्याने दिवसी उपवास करावा ॥ तेथे संदेह नाही ॥ जरि विद्ध एकादशी असली तरि
तेथे निर्णय ऐसा जाणावा ॥ जरि सूर्योदयी दशमी घटिका १ अथवा पळभर असली उपरांतिक एकादशी
दुसरे हि दिवसी कांही एकादशी असली व तिसरे दिवसी काहि द्वादशी उरली असली तरि पहिली दशमी

Indira Gandhi National Centre for the Arts

ति॰नि॰
॥११॥

विद्ध एकादशीटाकून दुसरे दिवसीं जें उरली असेल तीस उपवास करावा ॥ जरि सूर्योदयीं घटिका दो
नि घटिका दशमी असली तें च दिवसीं एकादशी असली दुसरे दिवसी काहिं नसली तरि जे दशमीयुक्त एकादशी
ते चि दिवसीं उपवास करावा ॥ जरि एकादशी घटिका ६० साठ असली दुसरे हि दिवसी काहि असलि तिसरे दि
वसी काहि द्वादशी असली तरि जे दिवसी साठ घटिका एकादशी असेल तें न करावी ॥ जे दुसरे दिवसी उरली
असेल तीस उपवास करावा ॥ जरि एकादशी दोनि चार घटिका असली आणि ते चि दिवसीं द्वादशी दुसरे दिवसी द्वा
दशी उरली नाही तरि स्मार्तांनि पहिले दिवसी दशमीस उपवास करावा जे उरली एकादशी तें दिवसी पारणे करा
वें ॥ उरली एकादशी उपवास न करावा ॥ जरि द्वादशी साठ ६० घटिका जाली दुसरे दिवसी काहि असली तरि त्तरि
स्मार्तांनि हि जे दिवसी साठि ६० घटिका द्वादशी ते चे दिवसी उपवास करावा ॥ जें दिवसी एकादशी ते दिवसी उपवास
न करावा ॥ जरि कोन्ही आग्रहें करून करितील त्यांनि दोनि उपवास करावे ॥ स्मार्त वैष्णव ह्मणिजे ऐसे ॥ ज्याची पहि
ली एकादशी ते स्मार्त जाणावे ॥ ज्याची दुसरी एकादशी ते वैष्णव जाणावे ॥ आतां वैष्णवांचा निर्णय ऐसा जाणावा ॥ ॥ राम ॥
वैष्णवास वेध अरुणोदई जाणावा ॥ अरुणोदय ह्मणिजे सूर्योदयापूर्वी घटिका चार ४ जाणावा ॥ ते एकाद ॥११॥

शीस जरि दशमी घटिका छपं ५६ असली तरि वैष्णवास विद्ध जाणावि ॥ जरि दशमी छप ५६ घटिका असली
तरि वैष्णवांनी एकादशीचे दिवसी उपवास न करावा ॥ केवळ द्वादशीचे च दिवसी उपवास करावा ॥ त्रयोदशीस
पारणे करावें ॥ जरि अरुणोदई दशमी नसली चौपं ५४ पंचावन्न ५५ घटिका असली दुसरे दिवसी एकादशी घ
टि ६० साठि असली तिसरे हि दिवसी कांही एकादशी उरली असली असली तरि जे दिवसी साठ ६० घटिका ए
कादशी ते दिवसी उपवास न करावा ॥ जे घटिका दोन घटिका उरली ते चि दिवसी उपवास करावा ॥ जरि दशमी घ
टिका चौपन्न अथवा त्रिपन्न ॥ ५४ ५३ अथवा पंचा ५५ असली दुसरे दिवसी एकादशी सत्तावन्न ५७ अठ
वंन ५८ असली व तिसरे दिवसी द्वादशी घटिका सा ६० जाली तरि एकादशीचे दिवसी उपवास न करावा ॥ जे दि
वसी साठ घटिका द्वादशी ते दिवसी उपवास करावा ॥ हे दोन्ही भेद केळावे ह्मणुनि लिहिले नाहि न रियेथ नि
र्वाह ऐसा जाणावा ॥ स्मार्तांस पार्ण्या कारणे घटिका दोनि घटिका कांही द्वादशी उरली असली तरि जे उरली द्वा
दशी ति चे पहिले दिवसी उपवास करावा ॥ ते एकादशी विद्ध होसा ॥ अथवा शुद्ध असो ॥ वैष्णवांचा निर्णय
ऐसा ॥ जरि दशमी घटिका ५६ छपन्न जाली तरि केवळ जे दिवसी द्वादशी असेल ते दिवसी उपवास करावा ॥

Indira Gandhi National
Centre for the Arts

एकादशीस्मन करावा॥ त्यांस केवळ दशमी विद्धएकादशी न करावी॥ द्वादशी पारपारणे कारणें अगस्त्य लागत नाही त्रयोदशीस पारणे करावें॥ परंतु दशमी विद्ध एकादशी न करावी॥ दोहीचा निर्वाह ऐसा जाणावा॥ इति एकादशी निर्णयः॥ आता श्राद्धाकारणे तिथिचा निर्णय ऐसा जाणावा॥ जे श्राद्धाचे तिथि असेल ते जे अपराह्णी असेल ते करावी॥ अपराह्ण म्हणिजे अग्राघटि १८ उपरि घटिका ६ ऐसा जाणाव्या॥ जरि दोही दिवसी अपराह्णी नाही न रि दुसरे दिवसी करावी॥ जरि दोही दिवसी अपराह्णी [illegible] असली तरि जे दिवसी अधीक असेल ते करावी॥ अथवा तिथीची वृद्धि असली रि दुसरे दिवसी करावी॥ वृद्धि म्हणिजे तिथीचा घटिका चढत जात असल्याने वृद्धि जाणावी॥ जरि तिथीचा ह्रास असल्यान रि पहिले दिवसी करावी॥ ह्रास म्हणिजे तिथीचा घटिका उण्या होत जात असल्यान रि तो ह्रास म्हणावा॥ ग्रहणाचा वेध ऐसा जाणावा॥ ॥जे प्रहरी ग्रहण लागत असे लत्या प्रहरापासून जाणावा॥ जरि चंद्रग्रहण असेल त रि जे प्रहरी ग्रहण असेल तो प्रहर त्या प्रहरापासून मागील दोन प्रहर ऐसा तीन प्रहर वेध जाणावा॥ त्यामध्ये भोजन करू नये॥ जरि सूर्यग्रहण असेल त रि तैसेच जे प्रहरी ग्रहण लागेल तो प्रहर व त्या मागील तीन प्रहर ऐसा चारि प्रहर वेध जाणावा॥ जरि ॥राम॥ ॥१२॥

चा ग्रस्तोदय असल्यान रि ते दिवसी दिवसा भोजन करू नये॥ रात्री ग्रहण सुटल्यावर उपरि भोजन करावें॥ जरि चंद्राचा ग्रस्तास्त असल्यान रि ते दिवसी सूर्योदया उपरि दिवसा भोजन करू नये॥ सायंकाळी रात्री शुद्ध बिंब देखिल्या उपरि मुक्त स्नान करून भोजन करावे॥ जरि सूर्याचा ग्रस्तास्त असल्यान रि ते दिवसी व रात्री हि भोजन करू नये॥ दुसरे दिवसी शुद्ध बिंब देखिल्या उपरि मुक्त स्नान करून भोजन करावें॥ ग्रहणाचे दिवसी उपवास करू नये म्हणउनि कांहि फळहार करावा निश्चक्र उपवास करू नये॥ सन्यास्यानी विधयानी निश्चक्र उपवास करावा ग्रहस्थाने उपवास करू नये॥ फळहार दिवसाच पहिले प्रहरी करावा मग करू नये॥ ग्रस्तोदय म्हणिजे धरिलाच उगवला तो ग्रस्तोदय जाणावा॥ ग्रस्तास्त म्हणिजे धरिलाच माळवला तो ग्रस्तास्त जाणावा॥ ॥इति ग्रहण निर्णयः॥ ॥हा तिथि निर्णय महाराष्ट्र भाषेने लिहिला म्हणउन पांडिती बोल न ठेवावा॥ जो निर्णय लिहिला आहे तो निबंध पाहून लिहिला॥ जरि कांही अधीक उणे असेल न रि शुद्ध करणे॥ त्याने बरा शोधकरूनी लिहिला आहे॥ ॥इति शंकरदेव यज्ञ विरचित तिथि निर्णयरत्नमाला समाप्त॥ ॥श्री सांबार्पणमस्तु॥ ॥[illegible] इदं पुस्तक भिकभटन लिखि फडके

ग्र.ग. २८१८

॥नि॰नि॰॥

॥१३॥ प्राग्धीवंशापूर्वतः षडंवनि स्तद्दूसराः पूर्वतास्त्रं शास्त्रोऽशापूर्वं नोपिपरतः पूर्वापरास्युर्दश॥ पूर्वाः षोडशो
नराः स्तुः भुवः पश्चात् चवेदाः पुनः पूर्वाः षोडशाचोत्तराः पुनरथो पुण्यास्तु मेषादिना॥ ३॥ तं पुस्तकं समाप्तं॥

१० मेष॰१० १५ सिंह १५॰ धन १५
१५ वृषभ॰ १० कन्या १० ॰मकर ४०
८ मिथुन १५ १५ तुळ॰ १५ कुंभ॰
३० कर्क॰ ॰वृश्चिक १५॰ मीन १५

॥राम॥
॥१३॥

Indira Gandhi National Centre for the Arts